पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई कार्यालय,
मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.
कार्यालयाचा पत्ता- वर्तक कॉलेज समोर, वसई रेल्वे स्टेशन जवळ, वसई पश्चिम
ता.वसई जि. पालघर ४०१२०२ फोन नं. ८६५५७२७५८२
Email ID- dcp.zone2.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.पोउआ.परि-२/मनाई आदेश/ ३३१ /२०२५ दि.२९/०१/२०२५

वाचले :-

१) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३,
२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई यांचेकडील दिनांक २६ जून २०२४ रोजीची विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे अधिकारी प्रदान झाल्याची अधिसुचना,
३) सपोआ, तुळींज यांचेकडील जा.क्र.१२/२०२५, दि.२८/०१/२०२५,
४) आचोळे पोलीस ठाणे जा.क्र.९८/२०२५, दि.२८/०१/२०२५.

पोलीस उप आयुक्त, परि-२ वसई विशेष कार्यकारी दंडाधिकारी मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय

---

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश :-**

**ज्याअर्थी,** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील व वसई-विरार शहर महानगरपालिकेचे प्रभाग समिती डी आचोळे कार्यक्षेत्रातील मौजे आचोळे येथील सर्वे नंबर २२ ते ३४ व ८३ विजयलक्ष्मी नगर, वसंतनगरी, नालासोपारा पुर्व येथील महानगरपालिकेच्या डंम्पिंग ग्राउंड व मलजल प्रक्रिया केंद्र (STP) साठी आरक्षित असलेल्या जागेवरील अनधिकृत बांधकामे दि.२९/०१/२०२५ ते दि.३१/०१/२०२५ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासीत करण्यात येणार आहेत.

**ज्याअर्थी,** वाचले क्रमांक ३ व ४ अन्वये प्रभारी अधिकारी आचोळे पोलीस ठाणे व सहा.पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांनी आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील मौजे आचोळे येथील सर्वे नंबर २२ ते ३४ व ८३ विजयलक्ष्मी नगर, वसंतनगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई येथील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करतेवेळी तेथील नागरीक व काही राजकीय पक्ष/संघटना यांचे कार्यकर्ते यांचेकडुन वरील कालावधीत सार्वजनिक शांततेचा सुरक्षेचा भंग होऊन, गैरप्रकार घडुन अनधिकृत बांधकाम निष्कासन प्रक्रियेस बाधा निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अगर सार्वजनिक शांतता व सुरक्षेचा भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता या कृत्यांना प्रतिबंध घालणे जरुरीचे असल्याने प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे गरजेचे असल्याचे कळविले आहे.

**त्याअर्थी,** मी पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व

Scanned with CamScanner

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील मौजे आचोळे येथील सर्वे नंबर २२ ते ३४ व ८३ विजयलक्ष्मी नगर, वसंतनगरी, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर या **परिसरात गुरुवार दिनांक ३०/०१/२०२५ रोजीचे ००:०१ वाजले पासुन ते शुक्रवार दिनांक ३१/०१/२०२५ रोजीचे २३:५९ वाजेपावेतोचे कालावधीत प्रवेश करण्यास मनाई आदेश लागू करीत आहे.**

**जो कोणी सदर आदेशाचा भंग करेल तो इसम भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाची प्रत स्थानिक वृत्त पत्रातुन प्रसिध्द करावी. **सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाया व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.** याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, संबंधित पोलीस ठाणे तसेच विभागीय सहा.पोलीस आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सदरचा आदेश आज दिनांक २९/०१/२०२५ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.**

**( पौर्णिमा चौगुले-श्रींगी )**
**पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई,**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय.**

प्रत :-

१. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, सेक्टर ५, रामनगर, शांती गार्डन, मिरारोड (पु.) जि.ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. जिल्हाधिकारी, पालघर यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. मा. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका माहितीस्तव सविनय सादर.
६. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, सेक्टर ५, रामनगर, शांती गार्डन, मिरारोड (पु.) जि.ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
७. उपविभागीय दंडाधिकारी, वसई यांना माहितीस्तव.
८. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, वसई यांना माहितीस्तव.
९. सहाय्यक पोलीस आयुक्त वसई व तुळींज विभाग यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
१०. प्रभारी अधिकारी वसई, माणिकपुर, नायगाव, तुळींज, आचोळे व वालीव पोलीस ठाणे यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner

११. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती डी आचोळे यांना माहिती व कार्यवाहीस्तव .

१२. जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी रवाना.

१३. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.

१४. नस्तीकरीता.

Scanned with CamScanner